दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




मुंबई || वर्ष २ २ || अंक २३६ || रविवार ११ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## विनवळ आश्रम शाळेत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा.

पालघर : दिनेश आंबेकर

९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवस, क्रांती दिन आणि नागपंचमी अशा त्रिवेणी संगम चे औचित्य साधुन मोठ्या उत्साहात आणि आनंदात कार्यक्रम साजरा करण्यात आला.आदिवासीं संस्कृती, रूढी, परंपरा यांचे जतन व्हावे यासाठी शाळे मध्ये उत्कृष्ट वेशभुषा, उत्कृष्ट नृत्य स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढून विद्यार्थी सुप्त गुण आणि कलेला वाव मिळावा त्याच बरोबर संस्कृती जतन व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेवून स्पर्धा पार पाडल्या.तसेच आज पर्यंत गाव, पाडा अशा स्तरावर गावातल्या गावात गरोदर अवस्थेत वेळोवेळी मदती ला धावून येणारी सुयेरीन बाई ( दाई) यांना बोलावून त्यांचा पुष्प गुच्छ आणि नववारी साडी देऊन त्यांचा आदर सत्कार केला. आपली संस्कृती, परंपरा आणि वारसा जपा नविन स्वीकारा पण जूने टिकवून ठेवा असा महत्वपूर्ण संदेश सुयेरीन ने दिला. तसेच इ.१० वी आणि १२ वी मध्ये विज्ञान आणि जीव शास्त्र विषयांत ९०+ मार्क मिळविणारे मुलं यांना आमंत्रित करून त्यांना ५००० रूपये रोख पारितोषिक देऊन पुढील शिक्षणाच्या शुभेच्छा दिल्या.अतिशय जोशात आणि आनंदात कार्यक्रम साजरा केला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक झुगरे सर सर्व सहकारी शिक्षक वृंद वर्ग ३/४ कर्मचारी उपस्थित राहून कार्यक्रम आदिवासीं परंपरे नुसार साजरा केला.




## जव्हारमध्ये जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा, हजारोंच्या संख्येने नागरिकांचा सहभाग..

-पालघर : दिनेश आंबेकर

जागतिक आदिवासी दिनानिमित्त जव्हार तालुक्यात हजारोंच्या संख्येने उपस्थितीत जव्हार शहरात भव्य रॅलीचे आयोजन करून आदिवासींची पारंपरिक नृत्याचे सादरीकरण पाहायला मिळाला. या जागतिक आदिवासी दिनानिमित्त हजारो बांधव एकत्र येऊन मोठ्या उत्साहात भव्य रॅली काढून जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.९ ऑगस्ट हा दिवस संपुर्ण संपूर्ण जगामध्ये साजरा करण्यात येत असून आदिवासी चालीरीती परंपरा , बोलीभाषा वेशभुषा , वाद्य , संगितज्ञ्याचे प्रत्यक्ष दर्शन या दिवशी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन बघायला मिळते. तसेच हजारोंची भव्य रॅलीत ढोल नाच, तारपा नाच, गौरीनाच, गरभानाच, तूरनाच, विविध नृत्यांचे सादरीकरण केले. तसेच या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार सुनिल भुसारा, सभापती विजया लाहारे, जव्हारचे राजे महाराज विजयसिंह मुकणे, विशेष सल्लगार हरीचंद्र भोये, तसेच जिल्हा परिषद सदस्य, आदी मान्यवरांनी उपस्थिती लावून आदिवासी बांधवांना शुभेच्या देण्यात आल्या.तसेच आदिवासी संघटना , सामाजिक संघटना,राजकिय पक्ष मंडळे ,संस्था यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहुन मोलाचे सहकार्य केले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त जव्हार तालुका युवा संघ यांनी यावर्षी मोठ्या उत्साहात आयोजन करून भव्य दिव्य रॅली काढून आदिवासींचे महत्व पटवून दिले.या कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरिता युवांचे अध्यक्ष राजू भोये, कार्याध्यक्ष विनूदादा मौळे, सचिव राजेश कोरडा, संघटक राहुल घेगड, तसेच या कार्यक्रमासाठी योगदान देण्याकरिता सल्लागार अशोक चौधरी, सल्लागार हरीचंद्र भोये, तसेच आजी माजी अध्यक्ष उपस्थित होते.



## शाळा परिसरांतील वाहतूक कोंडीवर उपायांसाठी पोलिसांची जनजागृती

नवी मुंबई : कोपरखैरणे, घणसोली भागांत शाळा सुटण्याच्या वेळेस सर्वच शाळांच्या समोरील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. त्यातून सुटका करण्यासाठी आता वाहतूक पोलिसांनी पुढाकार घेतला असून शाळा प्रशासनात जनजागृती केली आहे. शाळा सोडताना शाळेसमोरील रस्त्यांवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विविध उपाय सुचवले आहेत.

लोकसंख्येची सर्वाधिक घनता असणारा कोपरखैरणे आणि घणसोली येथे शाळा सुटण्याच्या वेळेस बहुतांश शाळांच्या परिसरांत प्रचंड वाहतूक कोंडी होते. अनेक पालक चारचाकी-दुचाकींचा आणतात. त्याचबरोबर शाळेच्या बसदेखील शाळेसमोर विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेत थांबतात.

चिंचोळे रस्ते, त्यात दोन्ही बाजूला वाहने उभी केल्यामुळे शाळांच्या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होते. त्यामुळे काही महिन्यांपूर्वी प्रत्येक शाळेसमोर वाहतूक पोलीसच तैनात करण्यात आले होते. मात्र शिक्षित असूनही दोनच मिनिटे म्हणत बेशिस्तपणे दुचाकी, कार अशी वाहने उभी करून ५ ते २० मिनिटे, कधीकधी अर्धा तास आपल्या पाल्यांची वाट पाहत पालक उभे असतात. यात महिला पालकांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असतो. वाहतूक पोलिसांनी कितीही समजावून सांगितले तरी दोनच मिनिटे म्हणत पालक उभे राहतात. ती परिस्थिती कायदा शिकवत दंड आकारण्याची नसते तर वाहतूक पटापट सुरळीत करण्याची असते, त्यामुळे वाहतूक पोलिसांची तारांबळ उडते, अशी माहिती एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याने दिली.

कोपरखैरणे वाहतूक पोलीस विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वास भिंगारदिवे यांनी पुढाकार घेत सोमवारी कोपरखैरणे येथील सेंट मेरी शाळेत कोपरखैरणे, घणसोली भागांतील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व इतर पदाधिकारी यांची बैठक घेतली. शाळा सुटताना व भरताना होणारी वाहतूक कोंडी यावर कसा मार्ग काढता येईल याविषयी चर्चा करून त्यानंतर शाळेच्या वाहतूक संदर्भातील अडचणींवर कसा मार्ग काढता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. सर्वांनी वाहतुकीचे नियम कसे पाळावेत याबाबत प्रबोधन केले. या वेळी ३८ शाळा-महाविद्यालयांचे मुख्याध्यापक व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच स्कूल बस, स्कूल व्हॅन युनियनचे पदाधिकारी हेदेखील उपस्थित होते. पालकांनी कसे वाहन उभे बस कशा पद्धतीने उभ्या कराव्यात जेणेकरून अन्य वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, शालेय वर्ग टप्प्याटप्प्याने सोडावे, शाळा प्रशासनातर्फे काही स्वयंसेवकांची नेमणूक शाळेचे पालक आणि बस चालकांशी समन्वय साधत वाहतूक नियंत्रित करावी असे अनेक उपाय यावेळी सुचवण्यात आले, अशी माहिती भिंगारदिवे यांनी दिली.



## सरकारने व्यापाऱ्यांसाठी 'लाडके व्यापारी' योजना जाहीर करावी– पुणे व्यापारी महासंघाची मागणी

पुणे : व्यापाऱ्यांनी भरलेल्या कराची रक्कम राज्याच्या विकास कामात न वापरता 'माझी लाडकी बहीण' आणि 'माझा लाडका भाऊ' या योजनांद्वारे मोफत वाटप करण्याचे सरकारने नुकतेच जाहीर केले आहे. सरकारने कराची रक्कम मोफत वाटपाचे ठरविले आहे. व्यापारी वर्गाने मेहनत करून जमा केलेल्या कराच्या रकमेतून व्यापाऱ्यांसाठी देखील 'लाडके व्यापारी' योजना सुरु करावी, अशी मागणी पुणे व्यापारी महासंघाकडून शनिवारी करण्यात आली.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना व्यापारी महासंघाकडून निवेदन देण्यात आले आहे. व्यापारी अर्थव्यवस्थेचा कणा असून, तो नियमितपणे कर सरकारकडे जमा करत असतो. कर भरताना त्याला अनेक किटकट बाबींना सामोरे जावे लागते. कर परतावा भरण्यासाठीच्या व्यवस्थेवर देखील बराच खर्च करावा लागतो. कर स्वरूपात जमा झालेली रक्कम राज्याच्या अनेक विकास कामात वापरणे सरकारची जबाबदारी आहे. मात्र, व्यापाऱ्यांनी भरलेल्या कराची रक्कम राज्याच्या विकास कामात न वापरता ती 'माझी लाडकी बहीण' आणि'माझा लाडका भाऊ' या योजनांद्वारे मोफत वाटप करण्याचे सरकारने नुकतेच जाहीर केले आहे. सरकारने कराची रक्कम मोफत वाटप करण्याचे ठरविले आहे. व्यापारी वर्गाने मेहनत करून जमा केलेल्या कराच्या रकमेतून व्यापाऱ्यांसाठी देखील 'लाडके व्यापारी' योजना सुरु करावी, अशी मागणी महासंघाचे अध्यक्ष फतेचंद रांका आणि सचिव महेंद्र पितळीया यांनी पत्रकार परिषदेत केली.

व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष सुर्यकांत पाठक, नितीन काकडे, अरविंद कोठारी, सहसचिव यशस्वी पटेल, राहुल हजारे, मिलिंद शालगर, सहखजिनदार प्रमोद शहा यावेळी उपस्थित होते. व्यापारी वर्गाकडून या सर्व योजनांचे स्वागत करण्यात आले आहे. मात्र व्यापारी वर्गाने मेहनत करून जमा केलेल्या कराच्या रकमेतून व्यापाऱ्यांसाठी सुद्धा 'लाडके व्यापारी' योजना सुरु करावी,. व्यापाऱ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या कराच्या रकमेच्या दहा टक्के निवृत्ती योजना जाहीर करावी. करोना संसर्ग काळात व्यापार बंद होता. व्यापारावर परिणाम झाला होता. तेव्हा व्यापाऱ्यांनी नियमित कर भरले होते, असे त्यांनी नमूद केले.

राज्यशासनाच्या धोरणानुसार बहुतांश दुकानदारांनी मराठीत नाम फलक लावले. त्यावर जीएसटी क्रमांक लिहिण्याचे बंधनकारक आहे. जीएसटी क्रमांक नामफलकात समाविष्ट करण्यात आला. शासनाने नामफलकाची उंची तीन फूट केल्याने सर्व मजकूर तीन फुटांत बसविण्यात अडचण येत आहे. दुकानाचा आकार विचार घेतल्यास नामफलकाची उंची आणि रुंदी जास्त ठेवावी लागते. नामफलकाची उंची वाढल्याने वाढीव फलकाच्या क्षेत्रफळाला ५८० रुपये आकारणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेने दुकानावरील जाहिरात फलकांसाठी आकारण्यात येणारा कर प्रति चौरस फूट १११ रुपयांवरून थेट रु. ५८० रुपये वाढविला आहे.



## पुणे पोलिसांची मोठी कारवाई, अमली पदार्थ विभागाकडून एक कोटीचे मेफेड्रोन जप्त

पुणे : पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विभागाने लोहगाव परिसरात छापा टाकून एक कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी तिघांना अटक केली. लोहगाव येथील विघ्नहर्ता अपार्टमेंट परिसरात ही कारवाई करण्यात आली.

श्रीनिवास संतोष गोदजे, रोहित शांताराम बेंडे आणि निमिष सुभाष अबनावे नावे अशी अटक करण्यात आलेल्या तरुणांची नावे आहेत.

याप्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोदजे अबनावे आणि बेंडे यांच्याकडे अमली पदार्थांचा साठा असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाले होती. त्यानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाने छापा टाकला. तिघांकडून एक कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

## नवसाक्षरता अभियानाकडे पुणे जिल्ह्याची पाठ, आतापर्यंत अत्यल्प नोंदणी

पुणे : शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या पुणे जिल्ह्याने निरक्षरांना साक्षर करण्यासाठीच्या नवसाक्षरता अभियानाकडे पूर्णत: पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. २०२४-२५ मध्ये राज्याकडून पुणे जिल्ह्याला ३८ हजार ३८ निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट्य देण्यात आले. मात्र ८ ऑगस्टपर्यंत केवळ ६३ निरक्षरांचीच नोंदणी झाली असून, निरक्षरांना शिकवण्यासाठी आवश्यक ३ हजार ८०८ स्वयंसेवकांपैकी केवळ २२ स्वयंसेवकांचीच नोंदणी झाली आहे.राज्यात योजना संचालनालयाकडून नवसाक्षरता अभियान २०२३-२४ पासून राबवण्यात येत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात १ कोटी ६३ लाख निरक्षर आढळून आले. त्यात पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १० लाख ६७ हजार निरक्षर आहेत. गेल्या वर्षी पुणे जिल्ह्याला मिळालेल्या ६३ हजार ९५० निरक्षरांच्या उद्दिष्टापैकी केवळ १२ हजार ६८४ निरक्षरांची ऑनलाइन नोंदणी झाली. त्यातील ९ हजार ८०७ जणांनी परीक्षा दिली. त्यातील ९ हजार ४२ उत्तीर्ण झाले. त्यामुळे गेल्यावर्षीची उद्दिष्टपूर्ती साध्य झालेली नसताना आता नवे उद्दिष्ट देण्यात आले

संपादकीय

## गुणवान परदेशी

आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागले नव्हते तोपर्यंत अभियांत्रिकीच्या तीन शाखांवर आपल्याकडे भर दिला जात असे. यांत्रिकी (मेकॅनिकल), विद्युत (इलेक्ट्रिकल) आणि स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी या तीन शाखांची विभागणीही गुणानुक्रमे होत असे. यापेक्षाही गुणवान 'आयआयटी'त जात. त्याही काळात याद्वारे होणारी अभियंत्यांची निर्मिती पुरेशी नव्हतीच आणि होते त्यातील गुणवान परदेशी जाण्यात धन्यता मानत. ही अभियंत्यांची संख्या वाढवावी या वरकरणी आणि दिखाऊ हेतूने आणि स्वपक्षीय राजकारण्यांस धननिर्मितीचे सहज सोपे साधन निर्माण व्हावे या अंतस्थ आणि खऱ्या हेतूने तेव्हा खासगी अभियांत्रिकीची दुकाने आपण मोठ्या प्रमाणावर उघडली. एखादी नवी योजना हाती घेण्याआधी तिच्या अंमलबजावणीचा साकल्याने विचार आणि तशी तयारी न करण्याचा आपला ऐतिहासिक परिपाठ याबाबतही दिसून आला. या नव्या खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे ना आवश्यक साधनसामग्री होती ना प्रशिक्षित अध्यापक. त्यात या संस्थांचे चालक पडले राजकारणी. त्यामुळे कोणत्याही दर्जा निश्चितीखेरीज पिठाच्या चक्क्यांप्रमाणे ही अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली गेली. स्वपक्षीय राजकारण्यांस सुखावण्यासाठी वा अन्यपक्षीय राजकारणी आपल्याकडे यावेत यासाठी या महाविद्यालयांचा खिरापतीप्रमाणे वापर झाला. ही महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक विद्यार्थीही आपणास मिळेनासे झाले. ही धोक्याची पहिली घंटा.

तीकडे दुर्लक्ष केल्याने परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत गेली. ती आणखी रसातळाला नेण्यात महत्त्वाचा वाटा उचलला नव्याने उदयास आलेल्या संगणकीय विद्याशाखेने. त्यातही बाजारपेठी आकर्षणास बळी पडून घरोघरी आपल्या लेक/लेकीस ''तू हार्डवेअरपेक्षा 'सॉफ्टवेअर'ला जा'' असे सल्ले मुबलक पालक देत. त्यामुळे अमूर्त अशा या विद्याशाखेत भरती होणारे वाढत गेले. त्यातील बहुसंख्य हे 'संगणकीय टंकलेखक' या दर्जाचे होते हे नाकारणे अवघड. यांचीही संख्या अखेर इतकी वाढली की बरकत असूनही सॉफ्टवेअर उद्योगावर त्यांना दरवाजाबाहेर बाकांवरच बसवण्याची वेळ आली. मागणीपेक्षा पुरवठा अधिक झाला– आणि तोही कमअस्सल दर्जाचा– की यापेक्षा आणखी काय होणार? संगणक अभियंते वाढले म्हणून भारतीयांनी काही संगणकीय उत्पादनांची निर्मिती केली म्हणावे तर त्याबाबतही बोंब. या क्षेत्रातील जे गुणवान होते त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरला आणि गूगल, ॲपल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आदी क्रियाशीलांची सेवा करण्यात धन्यता मानली. हे कमी म्हणून की काय या काळात एका नव्याच क्षेत्राचा उदय झाला.

ते म्हणजे सेवा क्षेत्र. कुणीतरी घरे बांधायची आणि इतरांनी ती सांभाळायची, घरात काही हवे–नको ते पाहायचे आणि लागेल तेव्हा हरकामास दाराशी सेवेस सादर व्हायचे म्हणजे 'सर्व्हिस इंडस्ट्री'. कितीही उदात्तीकरणाचा प्रयत्न केला तरी सेवा क्षेत्र म्हणजे अखेरीस यापेक्षा अधिक काही नाही. इंटरनेट महाजालाच्या प्रसार– प्रभावामुळे दूरदेशीच्या आस्थापनांचे पगार काढणे, कर्मचारी व्यवस्थापन, दूरध्वनीवरून माहिती देणे इत्यादी उद्योग येथे बसून करण्याची सुविधा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्याने आणि त्या प्रमाणात त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने आपल्याकडे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी त्या क्षेत्रात दाखल होऊ लागल्या. इतके दिवस अमेरिका, युरोप आदी विकसित देशांतील नोकरीच्या उच्चमध्यमवर्गीयांपुरत्याच उपलब्ध असलेल्या संधी या सेवा क्षेत्राच्या विस्ताराने बहुजन समाजातील तरुणांसही सहज मिळू लागल्या आणि पुणे, पार्ले, डोंबिवली आदी शहरांची मक्तेदारी पिंपरी–चिंचवड, परभणी आणि डिग्रस आदींनी मोडून काढली. यास जोड मिळाली ती वाढत्या वित्तीय (फायनान्स) आणि नंतर वित्त–तंत्र (फिनटेक) या क्षेत्रांची. कमी कष्टात अधिक पैसा कसा मिळवता येतो हे पहिल्याने दाखवून दिले आणि या दुसऱ्याने या वित्तक्षेत्रास सेवेची जोड दिली. अभियंते होऊन स्वत:स कष्टवण्यापेक्षा भांडवली बाजारात पैसे फिरवत अधिक नफा मिळवून देणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या या काळात अतोनात वाढली. परदेशी गुंतवणूकदारांस या काळात दोन पर्याय होते. चीन आणि भारत. यातील पहिला पर्याय निवडणाऱ्यांस चिनी राज्यकर्त्यांनी कारखानदारीत गुंतवणूक करणे भाग पाडले आणि दुसऱ्या पर्यायात भारतात फक्त पैसा आला. गुंतवणूक नाही.

# चिपळूण नागरी पतसंस्था व वाशिष्ठी डेअरी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील– सौ. स्वप्ना यादव ; खेर्डी येथील महिला बचत गट सक्षमीकरण व रोजगार निर्मिती कार्यक्रमात महिलांना दिली ग्वाही

चिपळूण (ओंकार रेळेकर)

कुटुंबाला हातभार लावण्यासाठी एखादी महिला सक्षमपणे उभी राहिली ती व्यवसायात चांगली पुढे आली तर नक्कीच एक कुटुंब उभं राहतं. कुटुंबाला आधार होतो. तुम्ही पुढे यायला पाहिजे. तुम्ही जिद्द ठेवा, कष्ट करण्याची हिम्मत ठेवा, चिपळूण नागरी पतसंस्था व वाशिष्ठी डेअरी तुम्हाला हात देईल, अशी ग्वाही चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व वाशिष्ठी डेअरीच्या मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव यांनी खेर्डी येथे वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. यांच्या संकल्पनेतून महिला बचतगट सक्षमीकरण व रोजगार निर्मिती कार्यक्रमाप्रसंगी महिलांना ग्वाही दिली. हा कार्यक्रम खेर्डी येथील संस्कृती सभागृहात शुक्रवारी झाला. यावेळी व्यासपीठावर खेर्डीच्या सरपंच सौ. अश्विनी पंडित, उपसरपंच सौ. सुप्रिया उतेकर, सदस्या सौ. सुगंधा माळी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडी तालुकाध्यक्ष सौ. राधा शिंदे, शहराध्यक्षा सौ. डॉ. रेहमत जबले, कार्याध्यक्षा सौ. अंजली कदम, उबाठा महिला आघाडी उपतालुकाप्रमुख सौ. दीप्ती सावंतदेसाई, भिले सरपंच सौ. आदिती गुढेकर, माजी नगरसेविका सौ. सीमा चाळके, चिपळूण अर्बन




बँकेच्या माजी संचालिका सौ. छाया खातू आदी उपस्थित होत्या. यावेळी खेर्डीमधील महिला बचतगट, ग्रामपंचायत सीआरपी प्रतिनिधी यांचा वाशिष्ठी डेअरी तर्फे सन्मान करण्यात आला.यावेळी सौ. स्वप्ना यादव पुढे म्हणाल्या की, चिपळूण नागरीच्या माध्यमातून स्वयंरोजगारासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो. यातून उद्योजक निर्माण झाले आहेत. यानंतर संस्थेने २००८ पासून शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज पुरवठा करण्यास सुरुवात केली. शेतकरी देखील उभे राहत असल्याचे पहावयास मिळत आहे. तर आता महिला देखील स्वयंपूर्ण झाल्या पाहिजेत, अशी आमची भावना आहे. त्यामुळे महिलांसाठी गृहलक्ष्मी कर्ज योजना सुरू करण्यात आलेली आहे. या कर्जातून महिला व्यवसायिक दृष्ट्या सक्षम होतील असा, आम्हाला विश्वास आहे. महिला बचतगटांना देखील आम्ही व्यवसायासाठी कर्ज पुरवठा करण्यास सुरुवात केलेली आहे, यासाठी महिलांनी पुढे यायला पाहिजे, असे सौ. स्वप्ना यादव यांनी यावेळी आवाहन केले. वाशिष्ठीच्या शॉपी महिला बचतगटांना चालवण्यास देण्याचा आमचा मानस चिपळूण नागरीचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून वाशिष्ठी डेअरी उभी राहिली आहे. या डेअरीच्या माध्यमातून शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. आम्ही काही शॉपी चालवत आहोत. तर काही शॉपी चालवण्यास दिल्या गेल्या आहेत. महिला बचतगट पुढे आल्यास वाशिष्ठी डेअरीच्या शॉपी चालवण्यास देण्याचा आमचा विचार आहे, असे त्यांनी महिलांना दिलासा दिला. तर वाशिष्ठी डेअरीच्या माध्यमातून कृषी दिनी कृषी मेळावा आयोजित करण्यात आला होता असे सांगून महिला बचतगटांच्या भाजीपाला व इतर उत्पादने विक्रीसाठी इमारत उभारणीसाठी प्रशांत यादव यांचे प्रयत्न सुरू असल्याचे सौ. स्वप्ना यादव यांनी यावेळी सांगितले.

तुमच्या आशीर्वादाची गरज शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या आशीर्वादाने प्रशांत यादव यांना पुढे जाण्याची संधी प्राप्त झाली आहे. तुम्हाला आम्ही साथ देतोय तशी तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. तुमचा हात त्यांच्या पाठीशी कायम राहू दे, असे आवाहन करताना तुमची कोणतीही अडचण असेल तर कधीही मला हाक मारा, आम्ही कायम तुमच्या पाठीशी आहोत, अशी ग्वाही दिली. वाशिष्ठी डेअरी कोकणात दीपस्तंभ ठरणार! जिद्द व कष्ट करण्याची हिम्मत असेल तर ते काय होतं त्याचं उत्तम उदाहरण वाशिष्ठी डेअरी ही आहे. पुढच्या कालखंडात एक दीपस्तंभ म्हणून वाशिष्ठी डेअरी आपल्या कोकणात उभी राहील असा विश्वास, वाशिष्ठी डेअरीच्या मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी चिपळूण नागरीच्या संचालिका एडवोकेट नयना पवार यांनी देखील आपले मनोगत मांडले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल टाकळे यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चिपळूण नागरी व वाशिष्ठी डेअरीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने मेहनत घेतली. या कार्यक्रमाबद्दल उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले. यावेळी सौ. सावित्री दुबे, सौ. अनिता चोरगे, सौ. मीना फाळके, सौ. स्वरा शिंदे, सौ. गीता फाळके, सौ. अंजली दाभाडे, सौ. श्रुती भुरण यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या.

**कृषी मेळाव्यामुळे महिला बचतगटांना मिळाली प्रेरणा मनोगतात सौ. दीप्ती सावंतदेसाई, सौ. गीता फाळके, सौ. सुप्रिया उतेकर, आर्या थरवळ, वीणा फाळके यांनी उमेदमुळे महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. वाशिष्ठी डेअरी आयोजित कृषी मेळाव्यात महिला बचतगटांना मोफत स्टॉल देऊन मोठी संधी उपलब्ध झाली. यातून आम्हाला प्रेरणा मिळाली आहे. भविष्यात देखील तुमची साथ मिळावी, अशी अपेक्षा या महिलांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली.**

# गोखले महाविद्यालयात क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन संपन्न

बोर्लीपंचतन :

( केतन माळवदे ) – श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन. येथे क्रांती दिन आणि आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. भारताच्या स्वतंत्र्य संग्रामात प्राणांची आहुती देणाऱ्या आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीच्या जोखडातून व अत्याचारापासून मुक्त करणाऱ्या क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे आणि आदिवासींच्या होणाऱ्या शोषणाविरुद्ध व अन्यायाविरुद्ध चळवळीचे प्रणेते, बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले. उपप्राचार्य व एन.एस.एस प्रमुख किशोर लहारे यांनी स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर लोकमान्य



टिळक आणि इतर क्रांतिकारकांप्रती आपले विचार मांडले. प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी यांनी भारत ही क्रांतीकारकांची आणि संत महंतांची भूमी आहे. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सावरकर, टिळक, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले, तात्या टोपे, सुभाषचंद्र बोस, हुतात्मा बाबू वेणू, भगतसिंग, राजगुरू, चाफेकर बंधू, ईश्वरचंद्र विद्यासागर आदी क्रांतीकाराकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. आणि त्यांना अभिवादन केले.ङ्गसमाजकारण व राजकारण करताना सशक्त समाजव्यवस्था निर्माण करण्याआधी स्वातंत्र्यवीरांचे योगदान अतुलनीय आहे, असे विचार प्रास्ताविकातून डॉ. विवेक खरे यांनी मांडले. ङ्गप्रसारमाध्यमातून प्रसारित होणाऱ्या अनेक विकृत, व्यभिचारी, अशांतता आणि अन्याय यांच्या प्रभावापेक्षा स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास व क्रांतिकारकांची देशाप्रती असलेली निष्ठा, प्रेम, आत्मीयता व त्याग याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांच्यात राष्ट्राभिमान, अस्मिता व राष्ट्रप्रेम जागृत व्हावे या दृष्टीने अशा कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात नेहमीच केले जाते.ङ्गया निमित्ताने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेसाठी, माझा आवडता क्रांतिकारक, आदिवासींना खरंच स्वातंत्र्य मिळाले आहे काय?, जननायक बिरसा मुंडा, वर्तमानातील स्वातंत्र्याची गळचेपी, आदिवासी की वनवासी हे विषय निबंधासाठी देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, श्री. नवज्योत जावळेकर यांनी केले आणि आभार प्रदर्शन, डॉ. विशाल माने यांनी केले. कार्यक्रमात सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने रत्नागिरीत विविध उपक्रमांचे लोकार्पण व उद्घाटन सोहाळा

दै,सूर्योदय,रत्नागिरी(प्रतिनिधी) : जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने रत्नागिरी येथे विविध लोकोपयोगी सामाजिक उपक्रमांचे लोकार्पण व उद्घाटन शनिवार दिनांक १० ऑगस्ट रोजी संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास येथील अनेक मान्यवर उपस्थित होते. ङ्गजिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या हस्ते रत्नागिरी दौऱ्यावर आज विविध कार्यक्रम आणि समाजिक उपक्रमांचे लोकार्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या दरम्यान येथील जय विनायक जयगड येथील गणपती मंदिरास सांबरे यांनी भेट देऊन दर्शन घेतले. यानंतर सांबरे हे वाटद खंडाळा या ठिकाणी आल्यानंतर येथील ग्रामस्थांनी ढोल ताश्यांच्या गजरात आणि पुष्पवृष्टी करत सांबरे यांचे स्वागत केले. ङ्ग जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था ही गेली १५ वर्ष कोकणातील पालघर , ठाणे ,




रायगड , रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात आरोग्य , शिक्षण , रोजगार , शेती आणि महिला सक्षमीकरण या मुद्यांवर काम करत आहे . संस्थेमार्फत चालू असलेल्या विविध मोफत उपक्रमांचा लाभ समाजातील गोर गरीब लोकांना होत आहे. आजपर्यंत लाखोंच्या संख्येने या उपक्रमांचा लाभ अनेक गरजूंनी घेतला आहे. ङ्गरत्नागिरी जिल्ह्यातही जिजाऊ संस्थेचा आधारवड विस्तारत असून वर्षभर मोफत वह्या वाटप, आरोग्य शिबीर , स्पर्धा परीक्षा वाचनालय, गरजूंना मदत यांसारखे अनेक उपक्रम राबविले संस्थेच्या माध्यमातून जात असतात . याच अनुषंगाने रत्नागिरी येथे आज जिजाऊ मोफत / स्पर्धा परीक्षा केंद्राचे व जिजाऊ मोफत कॉम्पुटर क्लासेसचे उद्घाटन निलेश सांबरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना सांबरे म्हणाले की, '' गुणवत्ता असतानाही आपल्या कोकणातील मुलांनी मागे का रहावे ? केवळ आर्थिक परिस्थिती नाही म्हणून तुम्ही थांबता कामा नये तुम्हांला उच्च शिक्षणासाठी लागेल ते सहकार्य एक कुटुंबप्रमुख म्हणून मी जिजाऊच्या माध्यमातून करेन '' तर यादरम्यान लवकरच येथील खंडाळा भागात सीबीएसईची मोफत शाळा संस्थेच्या वतीने चालु करण्यात येईल असे देखील सांबरे यांनी आश्वासन दिले. ङ्ग वाटद खंडाळ्यात मोफत अभ्यासिका आणि मोफत वाचनालय परीक्षा केंद्राचे देखील उद्घाटन यावेळी सांबरे यांनी केले. रत्नागिरी येथील नागरिकांच्या आरोग्याच्या सोयी सुविधेच्या दृष्टिकोनातून जिजाऊ मोफत रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा स्वा.वि. दा. सावरकर नाट्यगृह, मारुती मंदिर, नरहर कॉलनी, अभ्युदय नगर, रत्नागिरी येथे पार पडला . ङ्गया कार्यक्रमासपरिसरातील अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते. ङ्गयावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी संस्थेच्या विविध मोफत असलेल्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

# न्यायव्यवस्थाही ढासळली; नवीन सरकारनंतरही परिस्थिती जैसे थे

सरकार आल्यावर परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा होती. मात्र, नवीन सरकार येऊन २४ तास उलटल्यानंतरही देशातील हिंसाचार थांबायचे नाव घेत नाही. तसेच देशातील अल्पसंख्याकांवर प्रामुख्याने हिंदूंवरील अत्याचार वाढतेच आहेत. अशातच आता तिथे अजून एक घटना घडली आहे. बांगलादेशचे मुख्य न्यायाधीश ओबैदुल हसन यांनी राजीनामा दिला आहे. शनिवार, १० ऑगस्ट रोजी शेकडो आंदोलकांनी राजधानी ढाक्यात असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात एकच गर्दी केली. या आंदोलकांनी सर्व न्यायाधीशांना स्थानिक वेळेनुसार दुपारी १ वाजेपर्यंत राजीनामा देण्यासाठी अल्टिमेटम दिला होता. याच अनुषंगाने बांगलादेशचे मुख्य न्यायाधीश ओबैदुल हसन यांनी हा निर्णय घेतला. शनिवारी आंदोलकांनी सर्वोच्च न्यायालयाला घेरले त्यानंतर त्यांनी राजीनामा देण्याचे निश्चित केले.

बांगलादेशातील प्रमुख वृत्तपत्र द डेली स्टारच्या वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात जमल्यानंतर या आंदोलकांनी न्यायाधीश आणि मुख्य न्यायाधीशांनी राजीनामा



देण्याची मागणी केली होती. आणि राजीनामा दिला नाही तर या न्यायाधीशांच्या घरावर हल्ला करण्याचा इशारा देखील या आंदोलकांनी दिला होता. ही सगळी परिस्थिती पाहून सर्वोच्च न्यायालय तसेच अन्य कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांची सुरक्षा लक्षात घेत पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे देशाच्या मुख्य न्यायाधीशांनी प्रसार माध्यमांना सांगितले. शनिवार संध्याकाळपर्यंत आपण राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांच्याकडे आपला राजीनामा पाठवून देऊ असेही ते म्हणाले. बांगलादेशात नव्याने स्थापन झालेल्या हंगामी सरकारचे कायदेशीर सल्लागार आसिफ नजरूल यांनी सांगितले की, मुख्य न्यायाधीश ओबैदुल हसन यांच्याबद्दल अनेक वाद आहेत. जेव्हा ते परदेशात गेले तेव्हाही ते वेगवेगळ्या विचारसरणीच्या नेत्यांच्या घरी गेले होते. तसेच हंगामी सरकारच्या क्रीडा मंत्रालयाचे सल्लागार आसिफ महमूद यांनी देखील मुख्य न्यायाधीशांच्या बिनशर्त राजीनाम्याची मागणी केली आहे.

नवीन सरकारच्या शपथविधीनंतर मुख्य न्यायाधीशांनी कोणाशीही चर्चा न करता एक बैठक बोलावली होती. ही बैठक म्हणजे नवीन सरकारविरोधीतील कट असल्याचा आंदोलकांचा आरोप होता. आणि त्यानंतरच सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात आंदोलकांची गर्दी जमण्यास सुरुवात झाली. तसेच मुख्य न्यायाधीशांच्या राजीनाम्याची मागणी देखील करण्यात आली.

# परदेशातील युवकांची वाघ्रण येथील श्री गणेश चित्र शाळेला भेट

## गणेश चतुर्थीचे महत्व आणि गणेश मूर्तींच्या आभूषणाचा जाणून घेतला इतिहास

अलिबाग प्रतिनिधी

राजेश बाष्टे- रत्नाकर पाटील :

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील निर्भय आनंत धोदरे यांच्या श्री गणेश चित्र शाळेला परदेशातून आलेल्या तरुणांनी भेट देऊन गणेशमूर्ती निर्मितीचे कौशल्य जवळून अभ्यासले. हे तरुण भारतातील सांस्कृती, रितीरिवाज, खाद्यपदार्थ व्यवसाय ,सण,






उत्सव यांचा अभ्यास करण्यासाठी भारतात आले आहेत .ङ्गङ्गविघ्नहर्त्या बाप्पाचे जगभरातील आकर्षण सर्वश्रूत आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेमध्ये अध्यस्थान आसणाऱ्या गणरायाच्या विलोभनीय मुर्त्यांनी परदेशातील तरुणांनाही आकर्षित केले आहे .याचाच भाग म्हणून नेदरलँड, जर्मनी, इटली, ग्रीस या देशातून आलेल्या तरुणांनी अलिबाग ताल्युातील वाघ्रण येथील निर्भय आंनत धोदरे यांच्या श्री गणेश शाळेला भेट देऊन गणेश मूर्तीचा इतिहास,व त्याच्या आभूषण याची माहिती मूर्तिकाराकडून जाणून घेतली.परदेशी तरुणांनी विचारलेल्या प्रश्नांना मूर्तीकरांनी दिलेली मराठीतील उत्तरांचे इंग्रजी भाषांतर ऐकल्यावर त्या तरुणांच्या मुखातून गणपती बाप्पा मोरया हे शब्द सहजपणे बाहेर आले. गणेश चित्र शाळेला भेट देऊन बाहेर पडताना परदेशी तरुणांच्या चेहऱ्यावरती प्रसन्नाता पहावयास मिळेली.यावेळी मूर्तिकार निर्भय धोदरे , अनंत धोदरे ,कृष्णा धोदरे, आकाश धोदरे यांनीही माहिती दिली.ङ्ग ङ्ग नेदरलँड, जर्मनी , इटली, ग्रीस येथील या तरुणांनी जगभर भटकंती सुरू आहे. सध्या ते अलिबाग येथे असून भारतातील संस्कृती, राहणीमान,रितीरिवाज, खाद्यपदार्थ, व्यवसाय सण ,उत्सव, शिक्षण पद्धती याचा अभ्यास करत आहेत. अलिबागमधूनही चार युवकांना युथ एक्सजेची संधी मिळाली असून ते विविध देशात भटकंती करून त्यातील सांस्कृती समजून घेत आहेत.ङ्गङ्गजगातील युवकांना एकत्र जोडणाऱ्या लायन्स क्लब या संस्थेमार्फत देशोदेशीचा सांस्कृती अभ्यास करण्यासाठी युथ एक्सेज द्वारे ही संकल्पना राबवली जाते. यावर्षी अलिबाग लायन्स क्लब मेंबर्सकडे असे परदेशी युवक आले. लायन्सचे सेकंड डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक, ग्रँट कॉआर्डिनेटर अनिल म्हात्रे ,नयन कवळे डॉ. रवींद्र म्हात्रे ,डॉ. रेखा म्हात्रे, गिरीश म्हात्रे ,रणजीत जैन व इतर लायन सदस्यांनी या परदेशी युवकांना ही संधी उपलब्ध करून दिलीङ्गङ्ग दरम्यान परदेशातील आलेले हे तरुण कार्लेखिंड येथील डॉ .रविंद्र म्हात्रे याच्या कडे निवासी असून ते सर्व माहिती देत आहेत. पेपाईन नावाच्या नेदरलँड स्थित युवकाने देशातील विशेषता अलिबाग मधील डोंगर, झाडी, समुद्र आणि एकंदर वातावरण खूप आवडल्याचे उपस्थित समोर बोलून दाखविले.

# वक्फ विधेयक समितीसाठी ३१ खासदारांना नामनिर्देशन

नवी दिल्ली : लोकसभेने शुक्रवारी वक्फ दुरुस्ती विधेयकावर विचार करण्यासाठी संसदेच्या संयुक्त समितीच्या (जेपीसी) स्थापनेसाठी सभागृहाचे २१ आणि राज्यसभेचे १० सदस्य नामनिर्देशित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत समितीला अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. या समितीत भाजपकडून जगदंबिका पाल, निशिकांत दुबे, तेजस्वी सूर्या, अपराजिता सारंगी, संजय जैस्वाल, दिलीप सैकिया, अभिजित गंगोपाध्याय, डीके अरुणा, काँग्रेसकडून गौरव गोगई, इम्रान मसूद आणि मोहम्मद जावेद, समाजवादी पक्षाकडून मौलाना मोहिबुल्ला नदवी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, द्रमुकचे ए. राजा, तेलगू देसम पक्षाचे (टीडीपी) लावू श्रीकृष्णा, जनता दलाचे (युनायटेड) दिलेश्वर कामत, शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) सुरेश गोपीनाथ म्हात्रे, शिवसेनेचे नरेश गणपत म्हस्के, लोकजनशक्ती पक्षाचे (रामविलास) अरुण भारती आणि एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवैसी यांचा समितीत समावेश आहे.

# गर्दीने तुडुंब

गेल्याच आठवड्यात मुंबईतील सायन रेल्वे स्थानकावरील पूल बंद झाला आणि मुंबईकरांनी पुन्हा एकदा अभूतपूर्व वाहन कोंडी अनुभवली. हा त्रास आता तब्बल अडीच वर्षे मुंबईकरांना सहन करावा लागणार आहे, ही आणखी एक भयंकर गोष्ट आहे. मुंबई ही तिच्या समृद्ध वारशासाठी ओळखली जाते; आता ती सध्या बारमाही वाहतूक कोंडीने त्रस्त अशीही ओळखली जाऊ लागली आहे. मुंबई हे जगातील सर्वात वाईट रस्त्यांवरील रहदारीचे शहर आहे, ते पाचव्या क्रमांकाचे सर्वाधिक गर्दीचे शहर आहे. मुंबईतील वाहतुकीची स्थिती सातत्याने बिघडत चालली आहे. शहराचा गर्दीचा दर, प्रवासात घालवलेला सरासरी वेळ, बेसलाइन नॉन-कंजेस्टेड पातळीपेक्षा ५३ टक्के जास्त होता म्हणजे अर्ध्या मिनिटाच्या प्रवासाला गर्दीच्या वेळी २० मिनिटांपर्यंत जास्त वेळ लागतो. या वाहतूक कोंडीचे नागरिकांच्या वैयक्तिक आरोग्य आणि शहराच्या एकूण अर्थव्यवस्थेवर अनेक दीर्घकालीन प्रभाव पडत आहेत. वाहतूक कोंडीमुळे दिवसेंदिवस मुंबईचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे यात सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

त्यात गेल्या सहा महिन्यांत वाहतूक कोंडीत १८ हजार वाहनांची भर पडली आहे. हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांत शहरात गेल्या वर्षीच्या तुलनेत १८ हजार नव्या वाहनांची भर पडल्याने, मुंबईतील वाहतूक कोंडी आणखी वाढली आहे. मुंबईत सध्या ४८ लाख वाहने धावत आहेत. शहरात २ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत, त्यात २५% रस्त्यांची विविध कामे सुरू आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची आणखी भर पडली आहे. रिकव्हरमध्ये तर अक्षरशः तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत आहे. प्रवासासाठी लागणारा वेळ, इंधनावर होणारा खर्च त्यामुळे मनुष्याच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होत आहे.

मुंबईच्या वाहतुकीची समस्या निर्माण करणाऱ्या असंख्य घटकांपैकी एक म्हणजे शहराचा भूगोल हे आहे. नवी दिल्ली आणि इतर शहरांमध्ये त्रिज्यात्मक भूगोल आहे, त्यामुळे ते बाहेरून वाढतात आणि एका स्थानाला दुसऱ्या स्थानाला अनेक मार्गांनी जोडतात. दुसरीकडे मुंबई तिन्ही बाजूने अरबी समुद्राने वेढलेली आहे, ज्यामुळे तिची वाढ मर्यादित आहे. उत्तर आणि दक्षिणेला जोडणारे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग या दोनच प्रमुख महामार्गांमुळे गर्दीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. आता त्यात भर पूर्व मुक्त मार्गाची व सागरीकिनारा मार्गाची म्हणजेच कोस्टल रोडची झालेली आहे. पूर्व मुक्त मार्गावर आता सकाळ व संध्याकाळी भयंकर वाहतूक कोंडी अनुभवास मिळते. तसेच कोस्टल रोड अजून अपूर्ण अवस्थेत असल्याने, सध्या पूर्ण असलेल्या रस्त्यांच्या सुरुवातीस व संपण्याचा ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. अशा प्रकारे सर्वच ठिकाणांवरून मुंबईची कोंडी होत आहे. याशिवाय मुंबईत ४.१ दशलक्ष वाहने रस्त्यावर आहेत, त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. मुंबईतील कारची घनता प्रतिकिलोमीटर ६०० कारपर्यंत वाढली आहे, जी भारतात सर्वाधिक आहे. मुंबईच्या उपनगरात तर फूटपाथवरील अतिक्रमण, त्यात अरुंद रस्ते त्यामुळे गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होते आणि शहर कोंडल्यासारखे होते. त्यात वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणत आहेत.

सार्वजनिक वाहतुकीच्या पर्यायांबद्दल शहराच्या उपनगरीय रेल्वेवर जास्त भार आहे. दररोज ७५ लाख लोक रेल्वेने प्रवास करतात. त्यानंतर सर्वाधिक प्रवासी म्हणजे ३५ ते ३६ लाख प्रवासी बेस्ट बसचा वापर करतात. बेस्ट ही आधीच तोट्यात असल्याने, सध्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी संघर्ष करत आहे, त्यात कमी होत जाणारा बसताफा. बसताफा वाढवण्यात येणाऱ्या अडचणी पाहता, असलेल्या बस गाड्या वाहतूक कोंडीत अडकल्या कारणाने वेळेवर येत नसल्याने व येणाऱ्या बस या गर्दीने तुडुंब भरल्या असल्याने लोकांना हा पर्यायदेखील गैरसोयीचा वाटतो, त्यामुळे साहजिकच लोकांचा कल हा खासगी वाहनांकडे आढळून येतो, त्यामुळे स्वतःचे वाहन घेणे याकडे लोकांचा ओढा जास्त आहे, त्यातच कोरोना नंतर स्वतःच्या वाहनाची गरज हा पर्याय लोकांना जास्त आवडू लागला आहे. तिसरा पर्याय शहरातील मेट्रोसेवा.

सुस्थापित मेट्रो नेटवर्कचा अभाव हे शहरातील वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण आहे. सध्या मुंबई शहरात तीन मेट्रो सेवा सुरू आहेत व चौथी मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार आहे. मेट्रोच्या सुरू असलेल्या बांधकामासाठी घेतलेल्या जागेमुळे शहरातील काही भागांमध्ये रस्त्यावरील मार्गांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीवर मर्यादा आल्या आहेत. मुंबईत आणखी नवीन पाच मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत. मात्र ते सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होईल,

अशी आशा बाळगणे मूर्खपणाचे ठरेल, कारण सध्याच्या मार्गांवर मेट्रो सेवा सुरू आहे. तेथील वाहतुकीवर कोणताही फरक पडलेला नाही, उलट दिवसेंदिवस वाहतूक कोंडीही वाढत आहे. मुंबईत देशातील एकमेव मोनो मार्ग सुरू आहे; मात्र म्हणून तेथील मार्गाचा विचार करता व त्यावरील प्रवाशांची संख्या पाहता वाहतूक कोंडी कमी होईल, अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल .

नवनवीन येणाऱ्या गाड्यांचे प्रकार, लोकांकडे खुळखुळणारा पैसा त्यामुळे कोणताही सारासार विचार न करता व अनेक गाड्या रोज रस्त्यावर येत आहे व गर्दीच्या वेळेस सर्वच रस्त्यांवर अभूतपूर्वक कोंडी पाहावयास मिळत आहे. या वाढत जाणाऱ्या वाहनांसाठी कोणतीही पार्किंगची सोय उपलब्ध नसल्याने, सर्रासपणे रस्त्यावर गाड्या उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे साहजिकच रस्त्यावरील मार्गिका या पार्किंगने अडवल्या जात आहेत

# नॅशनल हायस्कूल मांदिवली येथे पालक शिक्षक संघ स्थापन .

केळशी प्रतिनिधी.

दि यंग पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित नॅशनल हायस्कूल मांदिवली .येथे पालक शिक्षक संघाच्या सर्व साधारण सभा शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम यांच्याअध्यक्षतेखाली झाली. अनस




मुजावर याने कुराण पठण केले. शाळेचे मुख्याध्यापक फैयाज सर यांनी पाहुण्याचे स्वागत करून प्रास्ताविक सादर केले. प्रास्ताविकात पालक शिक्षक संघाचा उद्देश, नियम, महाराष्ट्र शासनाचे विविध परिपत्रक लोकांना समजावून सांगीतले. ङ्ग सन २०२४/२५ करिता सर्वानुमते पालक शिक्षक संघाची पुनर्रचना करण्यात आली. यात अध्यक्ष: फैयाज सर ( मुख्याध्यापक) उपाध्यक्ष: मेहबूब हाशीम मुकादम (पालक) सचिव: परकार अरशद दाऊद (शिक्षक) सहसचिव: निगार फैयाज अहमद वलेले (पालक) सदस्य: १)नाझीमा इनायत फकी (पालक)२)जीनत इरफान मुकादम (पालक) ३) अब्दुल कादीर जमादार (शिक्षक) ४) उमर अब्बास मुजावर ( पालक) ५) फहीमा अझीम जुवळे ( शिक्षक) ६) आसीया मोहम्मद हुसैन मुकादम (पालक) ७) मजहर इब्राहिम दिवेकर (पालक)८) रमीजा अब्दुल वहाब अलवारे(पालक) ९) मुन्नवर हाशम मुकादम (पालक) नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले. शालेय समिती सदस्य गुलाम हुसैन भारदे यांनी आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी विद्यार्थी चे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात नूर मोहम्मद मुकादम यांनी शाळेच्या यशाबद्दल कौतुक केले. सभेचे सूत्रसंचालन जमादार सर यांनी केले. ङ्गकार्यक्रम यशस्वीतेबददल संस्था अध्यक्ष उस्मान मालवणकर, उपाध्यक्ष डॉ.अजीज सावंत, सचिव अ.कादीर खांचे, सहसचिव अस्लम जुवळे, शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम, व्हाईस चेअरमन इक्बाल मुकादम, सदस्य जमालुददीन मुकादम, गुलाम हुसैन भारदे यांनी अभिनंदन केले.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार ११ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## कुर्डूस जिल्हा परिषद मतदार संघातून भव्य दिव्य वर्षा सहलीसाठी तब्बल २४ बसेस रवाना.

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:-,

शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख राजाभाई केणी व रसिकाताई केणी यांच्या वतीने प्रथमच महिलांसाठी वर्षासहलीचे आयोजन करण्यात आले आहे. कुर्डूस जिल्हा परिषद मतदार संघातील माता भगिनींसाठी शनिवार दिनांक १० ऑगस्ट २०२४ व रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी महड, रांजणगाव, आई एकविरा, शनिशिंगणापूर, शिर्डी अशा पाच तीर्थक्षेत्रांचे आयोजन केले आहे. सदरील या वर्षासहलीसाठी तब्बल २४ सुस्थितीतील ट्रॅव्हल बसेसचे आयोजन जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी केले आहे.







कुर्डूस, हेमनगर, कुसुंबळे, कातळपाडा, पिटकिरी, काचळी, वाघविरा, नवीन वाघविरा, देहेन, शहाबाज, श्रीगाव, ताडवागळे, पेझारी, सांबरी गावांतील जवळ जवळ १२६५ महिला व १६८ लहान मुले मुली या वर्षा सहलीसाठी आज सकाळी रवाना झाली आहेत त्यामुळे सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. या वर्षा सहलीच्या आयोजनासाठी विशेष आयोजन समिती नेमण्यात आली असून प्रत्येक बसमध्ये स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत. तसेच सर्वासाठी भोजन,पाणी, राहण्याची व्यवस्था केली असून अतिशय नियोजनबद्धरित्या वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले असल्याने कोणतीही गैरसोय होणार नसल्याची माहिती यावेळी जिल्हाप्रमुख राजाभाई केणी तसेच रसिकाताई केणी यांनी यावेळी दिली आहे.

आत्तापर्यंतच्या कारकीर्दीत कोणीच इतक्या मोठ्या प्रमाणात माता भगिनींसाठी वर्षासहलीचे आयोजन केले नव्हते परंतु जिल्हाप्रमुख राजाभाई तसेच रसिकाताई केणी यांच्या प्रयत्नातून प्रथमच अशा मोठ्या स्वरूपात नियोजन करून वर्षा सहल काढण्यात आली आहे. यावेळी कुर्डूस जिल्हा परिषद मतदार संघातील

## देव्हारे पंचक्रोशी विद्यालयात हर घर तिरंगा रॅली चे आयोजन



देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महा. देव्हारे येथे आज रॅली चे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यालयाचे सर्व शिक्षक,विदयार्थी, व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. विद्यालयाचे प्राचार्य श्री. कापसे सरांनी सर्व विद्यार्थांना आपल्या राष्ट्राप्रती आदर भाव जागृत व्हावा, व राष्ट्रप्रेम वाढीस लागावं अशी अपेक्षा व्यक्त केली.

## शकील गवाणकर यांना या वर्षाचा लोकसत्ता संघर्ष पुरस्कार जाहीर

(राजेश बाष्टे अलिबाग)

रत्नागिरी येथील सामाजिक कार्यकर्ते व संपर्क युनिक फाउंडेशन एनजीओ रत्नागिरी चे अध्यक्ष शकील गवाणकर यांना या वर्षाचा लोकसत्ता संघर्ष पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



शकील गवाणकर हे पत्रकार असून ते गेली २५ वर्षे सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत,ते शैक्षणिक समुपदेशक आहेत, शासनाने त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती केली आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना यंदाचा राज्यस्तरीय लोकसत्ता संघर्ष पुरस्कार जाहीर झाला आहे.सदर पुरस्कार सोहळा २५ ऑगस्ट रोजी अहमदनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.शकील गवाणकर यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## इन्फिगो आयकेअर हॉस्पिटल तर्फे जिल्हा परिषद शाळा सवेणी यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर


खेड सवेणी येथे दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ शुक्रवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. या वेळी जिल्हा परिषद शाळा सवेणी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये ४० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी झाली.



या शिबीरासाठी रत्नागिरी प्रमुख जिल्ह्याचे गट शिक्षण अधिकारी श्री.संतोषजी भोसले तसेच श्री.गणोजी माने,श्री.एकनाथ पाटील व श्री गोपाल जाधव हे उपस्थित होते. या शिबीरदरम्यान डोळ्यासंदर्भातील समस्या वेळीच लक्षात आली आणि या शिबीराचा सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना फायदा झाला.

## सोयीच्या बदलीसाठी मंत्रालयात गर्दी ; अधिकाऱ्यांच्या बदल्या १६ पर्यंत करण्याचे निर्देश

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या १५ दिवसांपासून मंत्रालयात बदल्यांचा धडाका सुरू आहे. येत्या १६ तारखेपर्यंत बदल्या करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयुक्तांनी सर्व विभागांना दिले आहेत.या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील विविध विभागात बदल्यांसाठी धावपळ सुरू आहे. बदल्यांवरून मंत्र्यांमधील मतभेदही यानिमित्त चर्चेत आले आहेत.



राज्याच्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सप्टेंबर महिन्यात लागू होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सूचना केल्या आहेत. निष्पक्ष निवडणूक होण्यासाठी संबंधित जिल्ह्यात सेवा कार्यकाळ पूर्ण केलेल्या तसेच जिल्ह्यात नोकरी करत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात. याच धोरणानुसार राज्यात बदल्यांचा धडाका सुरू आहे. विद्यमान सरकारच्या काळातील या अंतिम बदल्या असणार आहेत.महसूल, पोलिस खात्यांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या सुरू आहेत. त्याचबरोबर आता जलसंपदा, आरोग्य ग्रामविकास, वनविभाग, सहकार आदी विभागांतील बदल्याही केल्या जाणार आहेत. गेल्या तीन दिवसांपासून मंत्रालयात मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली आहे. बहुतांश गर्दी ही बदली आणि विकासकामांच्या मंजुरीसाठी झाली असल्याचे दिसत आहे.

## ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये विधी साक्षरता शिबीर

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे,: मंगळवार, दि.०९ ऑगस्ट २०२४ रोजी,सकाळी ११:३० वा.ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग, सचिव मा.ॲड.अमोल अ.शिंदे ,वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधत मार्गदर्शन करताना युवांनी सामाजिक आणि राष्ट्रीय प्रगतीमध्ये सहभागी होण्यासाठी वैयक्तिक सुधारणा करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.स्त्रीभ्रूण हत्या टाळण्यासाठी युवांनी स्वतःच्या जाणीवा आणि संवेदनशीलता वृद्धिंगत करण्याची गरज आहे असे आवाहन केले.

जिल्हा विधी प्राधिकरणाचे सदस्य मा.ॲड तन्मय म्हात्रे यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिन या विषयावर मार्गदर्शन करताना युवांनी सार्वजनिक भान ठेवत,समाज माध्यमांचा वापर कसा करावा याबाबत माहिती दिली.जिल्हा विधी प्राधिकरणाच्या सदस्य ॲड.निलोफर शेख यांनी स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधात्मक कायद्यांची गरज आणि उपयोगिता याबाबत मार्गदर्शन केले.आय.क्यु.ए.सी.समन्वयक डॉ.संदिप घाडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या शिबीराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.ॲड गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ.साक्षी पाटील ,लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य ॲड.नीलम हजारे यांनी मार्गदर्शन केले.प्रा.पियुषा पाटील,प्रा.कौशिक बोडस,प्रा.सुरज पूरी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.प्रा.निलम म्हात्रे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. लॉ कॉलेजमधील आय.क्यु.ए.सी. आणि लिगल एड सर्व्हिसेस समितीमार्फत प्रा.चिन्मय राणे यांनी शिबीराचे आयोजन केले.(तुषार फोटोज अलिबाग)

## ''बास झालं, तुम्ही सेलिब्रिटी असाल पण...''; जगदीप धनखड यांनी जया बच्चन यांची काढली खरडपट्टी

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गेल्या काही दिवसांपासून राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड आणि खासदार जया बच्चन यांच्यात शाब्दिक द्वंद्व पाहायला मिळत आहे. धनखड यांनी जया बच्चन यांचे नाव घेताना जया अमिताभ बच्चन असे घेतल्यानंतर हा वाद सुरु झाला होता.

माझी स्वत:ची ओळख असताना माझ्या पतीचे नाव घेतले जाऊ नये, असे मत जया बच्चन यांनी व्यक्त केले होते. त्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या सत्रात धनखड आणि जया बच्चन यांच्यात थोड्या प्रमाणात शाब्दिक चकमकी पाहायला मिळत होत्या. त्यातील पुढचा अंक आज पाहायला मिळाला. आजच्या सत्रात जगदीप धनखड यांना राग अनावर झाला आणि त्यांनी जया बच्चन यांना अतिशय कठोर शब्दांत सुनावलं.

नक्की काय घडला प्रकार?

आजच्या राज्यसभेच्या कार्यवाहीदरम्यान जया बच्चन बोलण्यासाठी उभ्या राहिल्या आणि त्यांनी धनखड यांच्यावर एक आरोप केला. ''मी जया अमिताभ बच्चन, आज हे सांगू इच्छिते की मी एक कलाकार आहे, मला इतरांची देहबोली (बॉडी लँग्वेज) आणि चेहऱ्यावरील हावभाव समजतात. पण मला माफ करा सर, पण तुमचा बोलण्याचा टोन हा स्वीकारार्ह नाही. आपण सहकारी आहोत,'' असे जया बच्चन म्हणाल्या.जगदीप धनखड यांनी काढली खरडपट्टी ''जया जी, तुम्ही खूप नाव कमावलं आहे. सारे तुमचा आदर करतात. पण तुम्हाला माहिती असेल की अभिनेत्याला कुठली गोष्ट कशी सांगायची हे दिग्दर्शकाला योग्य माहिती असते. तुम्ही काही गोष्टी तिथे बसून पाहू शकत नाही, ज्या मी या खुर्चीत बसून पाहू शकतो. दररोज मला हे पुन्हा असा प्रकार नकोय. मी येथे पाहून बऱ्याच गोष्टी पाहिल्या आहेत. तुम्ही माझ्या टोन बाबत बोलताय... आता बास झालं... तुम्ही भले सेलिब्रिटी असाल पण तुम्हाला सदनाचे पावित्र्य राखावेच लागेल.

## मायनिंग हटवा, मांदिवली वाचवा

मांदिवली गावात पर्यावरणाचा नाश करणारा मायनिंग प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथी मारला जात आहे. गेल्या १८ ऑक्टोबर २०२३ रोजी मायनिंग संदर्भातील जनसुनावणी गावातील शेतकऱ्यांनी हाणून पाडली आणि तेव्हा पासूनच मायनिंग दलालांची तानाशाही चालू झाली.

आज पर्यंत कुठलीही परवानगी न मिळालेल्या या प्रकल्पासाठी रस्ता करणे व झाड कापणे हे काम मायनिंग कंपनीने चालू केले आहे. एवढेच नाही तर या प्रकल्पासाठी आवश्यक असणारा वन खात्याचा खोटा पंचनामा तयार करून मायनिंग दलालांनी मांदिवली पोलिस पाटील यांच्यावर सह्या करण्यासाठी दबाव आणला.

दिनांक ८ ऑगस्ट रोजी, वन अधिकारी सर्वेक्षणासाठी जागेवर येऊन गेले. त्यावेळेस जागेवर पोकलेन मशिन आढळलेले आणि ते वापरून नुकताच रस्ता केल्याचे दिसत होते.

हा रस्ता करताना आजूबाजूची बरीच झाड तोडली आहेत.वेळोवेळी प्रशासनाला तक्रारी देऊनही आजपर्यंत कुठलीही कारवाई झालेली नाही. प्रशासनाच्या या नाकरतेपणाच्या निषेधार्थ मांदिवली गावातील शेतकरी उपोषणाला बसणार आहेत.ङ्गङ्गआपण या विनाशकारी प्रकल्पाला विरोध दर्शविण्यासाठी जर आम्हाला पाठिंबा द्यायला इच्छुक असाल तर भेटुयात १५ ऑगस्ट रोजी दापोली तहसिलदार कार्यालयासमोर.भावेश कारेकर ९८१९०४०४५६

मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई – ४०००८१– अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )